गांवकरी

## चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत

# ठक्कर्स डेव्हलपर्सला साडेपाच कोटींचा नफा

नाशिक (वार्ताहर):- उत्तर महाराष्ट्रातील स्थावर मालमत्ता विकसन क्षेत्रातील पहिली पब्लिक लिमिटेड कंपनी असलेल्या ठक्कर्स डेव्हलपर्सला चालू आर्थिक वर्षाच्या दि.३० सप्टेंबर २०११ रोजी संपलेल्या पहिल्या सहामाहीत आयकराच्या तरतुदीनंतर रु. ५५४.३६ लाख इतका निव्वळ नफा झाला आहे. एक वर्षापूर्वी याच कालावधीत झालेल्या रु. ४७१.७९ लाख इतक्या निव्वळ नफ्याच्या तुलनेत यंदाचा हा नफा १७.५० टक्क्यांनी जास्त आहे.

एक वर्षापूर्वी सदर कालावधीत कंपनीची विक्री रु. १२५१.७१ लाख इतकी झाली होती. तिच्या तुलनेत यंदाच्या सहामाहीतील विक्रीत २१.२५ टक्क्यांनी वाढ झाली असून ती रु. २१.२५ टक्क्यांनी वाढ झाली असून ती रु.१५१७.८९ लाख इतकी झाली आहे.

मुंबई येथे अलीकडे झालेल्या कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत १२ टक्के लाभांशाची घोषणा करून या कंपनीनेआपल्या गुंतवणुकदारांना उत्साहीत केले आहे. स्थावर मालमत्तेचे प्रत्यक्ष वापरकर्ते व गुंतवणूकदार या दोन्ही घटकांच्या दृष्टीने ही कंपनी एक मोठे आकर्षण जशी यापूर्वी होती तशीच आताही आहे.

'ईव्हा लक्युरिया' या आपल्या मेगा प्रोजेक्टच्या नुकत्याच सुरू केलेल्या बुकिंगच्या दुसऱ्या टप्प्याला मोठा प्रतिसाद मिळेल, असा कंपनीला विश्वास वाटत आहे.

मुंबई- आग्रा व नाशिक- पुणे या महामार्गाचे 'जंक्शन' असलेल्या द्वारका सर्कलच्या जवळ टाकळी रोड या रम्य व सुशांत परिसरात ८ एकरांच्या विस्तीर्ण हिरवाईत ५०० लाईफ स्टाईल होम्सचा हा भव्य प्रकल्प सध्या वेगाने आकार घेत आहे.

30/11/2011